दु.क्र.०२०-२४४७६९३८
Email-socialscience
dept@maa.ac.in

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

---

जा.क्र./राशैसंप्रपम/सा.शा./शि.अधि.स्पर्धा/२०२५-२६/ **दिनांक**: १२/११/२०२५

प्रति,
१. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, (सर्व)
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
४. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई.
५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
६. शिक्षण निरीक्षक, (पश्चिम, दक्षिण, उत्तर), मुंबई.
७. प्रशासन अधिकारी,म.न.पा. / न.पा.(सर्व)

**विषय: शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी सामाजिक शास्त्र ऑलिंपियाड स्पर्धेचे आयोजन करणेबाबत.**

संदर्भ- १. मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि. १०/१०/२०२५.
२. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडील पत्र दि.१७/१०/२०२५.
३.शिक्षक व अधिकारी / कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शांळामधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजीटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धाच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धाचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. त्यापैकी **सामाजिक शास्त्र ऑलिंपियाड** स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर सामाजिक शास्त्र विभाग, SCERT, पुणे यांच्याकडे देण्यात आलेली आहे.

**सामाजिक शास्त्र ऑलिंपियाड स्पर्धेसाठी नियमावली** -

या स्पर्धेचे आयोजन हे तालुका, विभाग व राज्य स्तरावर करण्यात येणार आहे.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा / राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.
२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.
३. प्रत्येक स्पर्धेतील केंद्रातील किमान एक शिक्षकाचा सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.
४. सर्व स्पर्धेसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल.
५. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.
६. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
७. तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.
८. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी विभाग स्तर व राज्यस्तर आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी व एससीईआरटी पुणेकडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.
९. परीक्षा घेण्यात येणाऱ्या दिवशी परीक्षा संपल्यानंतर तातडीने उपस्थित परीक्षार्थींचे OMR sheet स्कॅन करून PDF फाईल आपल्या जिल्ह्याच्या DIET कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावी.
१०. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका दोन्ही जमा करण्यात याव्यात.

**अ) तालुकास्तर :**

१. परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ (MCQ) स्वरुपाचे असतील.
२. एकूण १०० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण, एकूण गुण १००, वेळ ९० मिनिटे.
३. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
४. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.
५. परीक्षेचा अभ्यासक्रम इयत्ता तिसरी ते बारावी संबंधित विषयांवरील व अद्ययावत घडामोडी यावर असेल.
६. २०% प्रश्न हे विषयाच्या अनुषंगाने सामान्यज्ञान व चालू घडामोडी यावर आधारित असतील.
७. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.
८. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.
९. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी ५०% किंवा १/२ गुण वजा/कमी

करण्यात येतील.

१०. प्रथम क्रमांकावरील उमेदवारास समान गुण पडल्यास ज्या उमेदवाराचे वजा गुण कमी असतील त्यास प्रथम क्रमांक देण्यात यावा.

११. या स्तरावरील प्रथम येणारा विजेता हा विभाग स्तरासाठी पात्र राहील.

**ब) विभागस्तर:**

१. परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ (MCQ) स्वरुपाचे असतील.

२. एकूण १०० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण, एकूण गुण १००, वेळ ९० मिनिटे.

३. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

४. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.

५. परीक्षेचा अभ्यासक्रम इयत्ता तिसरी ते बारावी संबंधित विषयांवरील व अद्ययावत घडामोडी यावर असेल.

६. २०% प्रश्न हे विषयाच्या अनुषंगाने सामान्यज्ञान व चालू घडामोडी यावर आधारित असतील.

७. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.

८. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

९. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी ५०% किंवा १/२ गुण वजा/कमी करण्यात येतील.

१०. प्रथम क्रमांकावरील उमेदवारास समान गुण पडल्यास ज्या उमेदवाराचे वजा गुण कमी असतील त्यास प्रथम क्रमांक देण्यात यावा.

११. या स्तरावरील प्रथम पाच क्रमांकाचे विजेते हे विभाग स्तरासाठी पात्र राहतील.

**क) राज्य स्तर:**

१. परीक्षेतील प्रश्न वस्तुनिष्ठ (MCQ) स्वरुपाचे असतील.

२. एकूण १०० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण, एकूण गुण १००, वेळ ९० मिनिटे.

३. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

४. परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल.

५. परीक्षेचा अभ्यासक्रम इयत्ता तिसरी ते बारावी संबंधित विषयांवरील व अद्ययावत घडामोडी यावर असेल.

६. २०% प्रश्न हे विषयाच्या अनुषंगाने सामान्यज्ञान व चालू घडामोडी यावर आधारित असतील.

७. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.

८. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

९. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी ५०% किंवा १/२ गुण वजा/कमी करण्यात येतील.

**वेळापत्रक-**

सदर स्पर्धा तालूका, विभाग व राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे -

१. तालुकास्तरीय स्पर्धा नोव्हेंबर २०२५ (चौथा शनिवार)
२. विभागस्तर स्पर्धा डिसेंबर २०२५ (चौथा शनिवार )
३. राज्यस्तर स्पर्धा जानेवारी २०२६ (चौथा शनिवार)

या स्पर्धेसाठी स्तरनिहाय प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तरसूची (model answer sheet) सामाजिक शास्त्र विभाग, SCERT, पुणे मार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. परीक्षेची वेळ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेस कळविली जाईल. स्पर्धकांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट आपल्या स्तरावर उपलब्ध करून देण्यात याव्यात. उत्तरपत्रिका तपासणी व आवश्यक सर्व कामकाज आपल्या स्तरावर विहित कालावधीत पूर्ण करावे. या सर्व कामकाजात गोपनियता असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी तालुका व विभाग स्तरावर सनियंत्रण समितीचे गठण करण्यात यावे.

Digitally signed by
Arun Maruti Jadhav
Date: 12-11-2025
10:08:36

(अरुण जाधव)
उपसंचालक
सामाजिक शास्त्र, कला व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
महाराष्ट्र, पुणे